......

दि.दावा क्र.७३/२०१४
नि.क्र.६४

**<u>प्रतिवादीचे साक्षीदार क्र.१ यांचा पूढील सरतपास ॲड. महाल्ले यांचेमार्फत शपथेवर सुरू :-</u>**

आता मला माझे सर तपासाचे प्रतिज्ञापत्र दाखविले. ते माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

**मी खालीलप्रमाणे दस्तऐवज दाखल केले आहे :-**

१. फेरफार नोंद क्र.४, ८ व ९७ चे उतारे दाखल केले आहेत. ते नि.६५ ते ६७ कडे आहेत.

२. दावा मिळकतीचा १३/1 सन ९१-९२ व ९२-९३ चे दोन सात बारा उतारे दाखल केले आहेत. ते नि.६८ व ६९ कडे आहेत.

३. दावा मिळकतीचा १३/२ सन ९१-९२ चा सात बारा उतारा दाखल केला आहे. तो नि.७० कडे आहे.

४. वडिलोपार्जीत घराची कर भरल्याची पावती दाखल केली आहे. ती नि. ७१ कडे आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.५ ते ९ व ११ करिता वकील श्री. मांडवकर यांचेमार्फत</u> :-**

हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही महादेव लोखंडे यांचे वडिल दशरथ यांचे मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यांची बहीण शांती सुखदेव कांबळे यांचे निधन १९९६ मध्ये झाले. तसेच कौशल्या कांबळे हिचे निधन सन २००० मध्ये झाले तर बहिण सुभद्रा कांबळे हिचे निधन २०१४ मध्ये झाले.

हे म्हणणे खरे आहे की, दाव्याचे कामी या तीन बहिणींनी आपले हक्क सोडून दिले असे दर्शविणारा कोणताही हक्कसोड लेख दाखल केलेला नाही. माझे माहितीप्रमाणे हक्कसोड लेख हा नोंदणीकृत नव्हता. मी याप्रमाणे

हक्कसोड लेख पाहिलेला नाही कारण मला रेव्हन्यू खात्याकडुन तो गहाळ झाला असे सांगण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, या तिन्ही बहिणींनी कधीही अशा प्रकारचा हक्कसोड लेख लिहून दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार नांद क्र.९७ (नि.६७) मध्ये तिनही बहिणींचे नावाचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, यावर तिनही बहिणींचे सहया अंगठे आहेत, असे दिसून येते. हे म्हणणे खरे नाही की, सन २००९ मध्ये बहिण कौशल्या व शांती या दोघी मयत असतांनाही, पटवारी याचेशी संगणमत करून खोटी फेरफार नोंद क्र.९७ दाखल करण्यात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजही दावा मिळकतीमध्ये तिनही बहिणींचा कायदेशीर हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मयत सुभद्रा कांबळे हिचे वारस प्रतिवादी क्र.५ व ६ आहेत. प्रतिवादी क्र.७ हे मयत शांती कांबळे हिचे वारस आहे किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.८ ते ११ हे मयत कौशल्या कांबळे हिचे वारस आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.५ ते ११ हयांचा हिस्सा डावलण्याकरिता खोटी साक्ष देत आहे.

**वादीकरिता वकील श्री. पोंगडे यांचे विनंतीवरून उलटतपास पूढील तारखेपर्यंत तहकुब**

वा.दा.ब.अ.क.केले.
समक्ष,

(एस.व्ही. देशमुख)
दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),
उमरेड.
दि.०२.०४.२०१८